शरद पवार इन्स्पायर फेलोशिप 2026-27

# मूल्यांकनावर आधारित नवोपक्रम प्रस्ताव :

## अपेक्षा आणि पुढील नियोजित कार्यवाही

# फेलोशिपसाठी मूल्यांकन हाच विषय का निवडला? - 1

**अध्ययन-अध्यापन पद्धतीचे स्वरूप मुख्यतः मूल्यांकन प्रक्रियेवर अवलंबून असते.**

- प्रचलित मूल्यांकन पद्धतीत पुढील दोष आजही आढळतात –
    - मुख्यतः बोधात्मक क्षेत्राचाच विचार आणि स्मरणावर भर,
    - वैचारिक, भावनिक, सामाजिक, नैतिक विकासाला नगण्य स्थान,
    - साचेबद्ध प्रश्नपत्रिका व उत्तरे,
    - मुलांचे प्रकल्प, तोंडी काम इत्यादींच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह,
    - विद्यार्थ्यांमधील विविधता आणि त्यांचे सुप्त गुण यांकडे दुर्लक्ष..

ही यादी आणखीही वाढवता येईल...

# फेलोशिपसाठी मूल्यांकन हाच विषय का निवडला? - 2

## नवीन शैक्षणिक धोरणानुसार प्रचलित मूल्यांकन प्रक्रियेत मोठे बदल अपेक्षित आहेत -

- मूल्यांकनाचा वापर विद्यार्थ्यांची वर्गवारी करण्यासाठी नाही, तर एकूण शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी करायचा आहे.
- प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीची, सुप्त गुणांची आणि त्यांच्या विकासाची नोंद ठेवायची आहे.
- मूल्यांकनात बौद्धिक विकासाप्रमाणे मनोकायिक, भावनिक, वैचारिक, सामाजिक, नैतिक अशा समग्र विकासाची नोंद घ्यायची आहे.
- मूल्यांकनात विद्यार्थी, त्यांचे पालक यांना सहभागी करून घ्यायचे आहे.
- मूल्यांकनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन मिळणे अपेक्षित आहे.
- मूल्यांकन ही अध्ययन-अध्यापनाबरोबर सुरू राहणारी सातत्यपूर्ण प्रक्रिया असेल.

## हे अपेक्षित बदल करण्यात शिक्षकांना येणाऱ्या संभाव्य अडचणी :

- पुरेसा वेळ आणि साधन-सुविधा यांचा अभाव
- शाळा आणि परिसरात पोषक वातावरणाचा अभाव
- नवीन पद्धतीसाठी लागणाऱ्या तंत्रांची, साधनांची नीटशी माहिती नसणे
- नवीन तंत्रे, साधने वापरण्याचा अनुभव नसणे
- प्रचलित अभ्यासक्रमासाठी नवीन तंत्रे, साधने वापरुन पाहण्याची संधी नसणे
- अनुरूप तंत्रे, साधने विकसित करण्याइतके विषयज्ञान नसणे

**या संदर्भात काम करू इच्छिणाऱ्या शिक्षकांना मदत, मार्गदर्शन देणे हा या वर्षीच्या फेलोशिप्सचा मुख्य उद्देश आहे.**

## नवीन मूल्यांकन पद्धतीतील काही वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना - 1

- **Holistic Progress card** – विकासाच्या सर्व पैलूंची दखल घेणारे प्रगती पत्रक; त्यात शिक्षकांकडून होणाऱ्या मूल्यांकनाबरोबरच स्वयं-मूल्यांकन, तसेच सहाध्यायी आणि पालकांकडून होणाऱ्या मूल्यांकनाचा समावेश
- **Portfolio** – विद्यार्थ्यांचे विश्वासार्ह पोर्टफोलिओ बनवणे, त्या अनुषंगाने शिक्षकांची निरीक्षणे आणि पालकांशी केलेल्या चर्चांची नोंद
- **Open book test** – खुल्या चाचण्यांसाठी अनुरूप प्रश्नपत्रिकांची निर्मिती आणि त्यांचा मूल्यांकनात वापर

## नवीन मूल्यांकन पद्धतीतील काही वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना - 2

- **Rubrics** – विद्यार्थ्यांच्या मदतीने वेगवेगळ्या पाठ्यघटकांसाठी रूब्रिक्स - मूल्यांकन निकष आराखडे - तयार करून विद्यार्थ्यांना स्वतःची कामगिरी जाणीवपूर्वक सुधारण्याची दिलेली संधी आणि शिक्षकांच्या आनुषंगिक नोंदी
- **Field visits** – क्षेत्रभेटीच्या वेळी विद्यार्थ्यांनी केलेले शैक्षणिक काम (मुलाखती, निरीक्षणे, अनुमान, नोंदी) आणि त्यांचे वर्तन यांची मूल्यांकनात घेतलेली नोंद
- **Projects** – वैयक्तिक, गटवार किंवा सामुदायिक प्रकल्पातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या कामगिरीची मूल्यांकनात घेतलेली $360^0$ नोंद

## नवीन मूल्यांकन पद्धतीतील काही वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना - 3

- **Integrated education** – एकात्मिक अध्ययन-अध्यापन करताना वेगवेगळ्या विषयांतील समान सूत्रांची सांगड घालून विद्यार्थ्यांना प्रकल्प, चाचण्या तसेच इतर एकात्मिक काम देणे आणि विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक मूल्यांकनात त्याची नोंद घेण्याची तरतूद करणे
- **Self- paced learning** – विद्यार्थ्यांच्या आधीच्या कामगिरीच्या तुलनेत त्यांनी केलेल्या / न केलेल्या प्रगतीची त्यांच्या वैयक्तिक मूल्यांकनात नोंद घेणे.

**यांपैकी एक किंवा मूल्यांकनाशी निगडित इतर कोणतीही एक नवीन संकल्पना आपल्याला नवोपक्रमासाठी निवडता येईल.**

## नवोपक्रम निवडताना –

- नवोपक्रम मूल्यांकनातील नवीन कल्पना/तंत्रे यांच्याशीच संबंधित असावा
- नवोपक्रम आपल्याला आपल्या वर्गात राबवता येईल, असा असावा.
- नवोपक्रम किमान एका शैक्षणिक सत्रासाठी सातत्याने वापरता येईल, असा असावा.
- प्राथमिक/माध्यमिक स्तर आणि उपक्रमाचे स्वरूप लक्षात घेता, तो सर्व विषयांसाठी वापरता येईल किंवा एकाच विषयासाठीही वापरता येईल.
- नवोपक्रमात विद्यार्थ्यांच्या कामाच्या तसेच आपल्या निरीक्षणांच्या नियमित नोंदी ठेवणे महत्त्वाचे आहे.

## प्रस्ताव लिहिण्यापूर्वी –

- फेलोशिपच्या वेबसाइटवर दिलेले शैक्षणिक फेलोशिपचे तपशील आणि नियमावली काळजीपूर्वक वाचा.
- त्याच ठिकाणी प्रस्तावात अपेक्षित मुख्य बाबी आणि सर्वसाधारण आराखडा दिलेला आहे, त्यानुसार लेखन करा.
- फेलोशिपच्या वेबसाइटवर प्रस्ताव लेखन कसे करावे याविषयी सविस्तर माहिती देणारा डॉ वृषाली देहाडराय यांचा व्हिडिओ दिलेला आहे. तिथे  विहित नमुन्यात आणि सुस्पष्ट प्रस्ताव कसा लिहावा याचे मार्गदर्शन मिळेल.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (4.34 ते 4.37) आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCFSE 2023 – Section 3.4) यांतील हा मूल्यांकन विषयक भाग वाचा. राज्य स्तरावरील अभ्यासक्रम आराखड्यातील संबंधित भाग वाचा.

## प्रस्तावात दिलेला नवोपक्रम किंवा त्याची कार्यपद्धती यात नंतर बदल करता येईल का?

आपल्या प्रस्तावाची निवड झाल्यानंतर आपल्याला आवश्यकता वाटल्यास किंवा तशी गरज निर्माण झाल्यास तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या मदतीने/सल्ल्याने आपल्याला प्रस्तावित नवोपक्रम किंवा त्याची कार्यपद्धती यांत बदल करण्याची मुभा राहील.

तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या सल्ल्याने मूल्यांकन विषयक दुसरा वेगळा नवोपक्रम निवडण्याचीही संधी मिळू शकेल.

## फेलोशिपसाठी आपली निवड झाल्यास कोणती शैक्षणिक मदत मिळेल?

फेलोशिपसाठी निवड झालेल्या सर्व शिक्षकांना मूल्यांकनविषयक नवीन भूमिका, पद्धती, साधने, कृतिसंशोधन पद्धती तसेच नोंदी आणि अहवाल लेखन यांबाबत मार्गदर्शन देण्यासाठी कार्यशाळा आयोजित केल्या जातील.

नवोपक्रम राबवत असताना आवश्यकतेनुसार वेळोवेळी तज्ज्ञांचे वैयक्तिक मार्गदर्शन मिळेल.

## मूल्यांकन फेलोशिपमधून साध्य होऊ शकणाऱ्या बाबी –

- ‘मूल्यांकन’ या विद्यार्थी, शिक्षक, पालक सर्वांच्या जिव्हाळ्याच्या विषयात काम करण्याची संधी
- मूल्यांकन प्रक्रियेत पुढे होणाऱ्या अपरिहार्य बदलांचा आधी अभ्यास करण्याची संधी
- मूल्यांकनातील नवे आयाम तज्ज्ञांच्या मदतीने छोट्या, प्रायोगिक स्वरूपात राबवून पाहण्याची संधी
- आपल्या वर्गातील अध्यापन विद्यार्थ्यांच्या विकासाच्या दृष्टीने अधिक रंजक, प्रभावी, अद्ययावत करण्याची संधी
- इतरांना पथदर्शक होईल असे काम करण्याची संधी

मा. धनवंती हर्डीकर,
(माजी विद्यासचिव, बालभारती.) विशेष सल्लागार,
शिक्षण विकास मंच,
यशवंतराव चव्हाण सेंटर.

धन्यवाद
आणि
शुभेच्छा!